**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५६/२०१७** **दिनांक १४/०७/२०१७** **कालावधी ५ दिवस**


| **डॉ. सुभाष चव्हाण,** | **डॉ. ज्ञानेश्वर जगताप,** | **प्रा. विरेश चव्हाण,** |
|---|---|---|
| विभाग प्रमुख, | नोडल ऑफिसर, | तांत्रिक अधिकारी, |
| कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग | कृषिविद्या विभाग |
| ९४२२४३१०६७ | ९४०३९८८१४३ | ९४२२०६५३४४ |


| **मागील हवामान सारांश दि. १०/०७/२०१७ ते १४/०७/२०१७** | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | |
| पाऊस (मिमी) १/१/१६ पासून | : | |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | |
| कमाल तापमान (अं.से) | : | |
| किमान तापमान (अं.से) | : | |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | |

**हवामान पूर्वानुमान (१५/०७/२०१७ सकाळी ८:३० पासून १९/०७/२०१७ सकाळी ८:३० वाजेपर्यंत)**

| **हवामानांचे घटक** | : | **१५/०७** | **१६/०७** | **१७/०७** | **१८/०७** | **१९/०७** |
|---|---|---|---|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ८० | ४५ | ३० | ३६ | ५५ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३० | ३० | ३० | ३० | २९ |
| किमान तापमान (अं.से) | : | २५ | २६ | २५ | २५ | २५ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ८ | ७ | ३ | ४ | ६ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ८४ | ८३ | ८३ | ८६ | ८५ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | : | ८० | ८० | ७९ | ८१ | ७७ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०२८ | ०३२ | ०२९ | ०१३ | ००६ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

**:हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:**

**दिनांक १५ ते १९ जूलै, २०१७ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक १५ ते १९ जूलै, २०१७ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनांक १५ ते १९ जूलै, २०१७ पर्यंत वाऱ्याचा वेग ६ ते ३२ किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | -- | • भात क्षेत्रातील बांधांची बाध.बंदीस्ती करावी.<br>• भात पिकाची पुनर्लागण (लावणी) करण्याकरिता खरीप हंगामात (पावसाळी) १२ ते १५ सें. मी. उंचीची पाच ते सहा पाने फुटलेली २२ ते २५ दिवसांची रोपे लावणीसाठी वापरावीत.<br>• चिखळणीच्या वेळी ४० किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि ५० किलो पालाया प्रती हेक्टर खताची मात्रा द्यावी.<br>• भाताच्या रोपांची लावणी २० x १५ सें. मी. अंतर ठेवून करावी. लावणी सरळ आणि उथळ (२.५ ते ३.५ सें. मी. खोल) करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडात तीन रोपे लावावीत संकरित भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे.<br>• बांधावरील खेकडयांचा बंदोबस्त करावा त्यासाठी १ किलो शिजलेल्या भातामध्ये ७५ टक्के पा.मि. ॲसिफेट पावडर ७५ ग्रॅम किंवा पा.मि. कार्बारिल भूकटी १०० ग्रॅम टाकून विषारी अमिष तयार करावे. या मिश्रणाच्या साधारणपणे १०० गोळया तयार करून प्रत्येक बिळाच्या आत तोंडाशी एक गोळी ठेवावी व बीळ बुजवावे, दुसऱ्या दिवशी जी बीळे उकरली जातील अशा बिळात परत अमिष वापरावे. |
| आंबा, काजू | | • पूर्ण वाढलेल्या आंबा झाडास (१० वर्षावरील) ५० किलो शेणखत/कंपोस्ट आणि १.५:०.५:१.० किलो नत्र, स्फुरद, पालाश अशी मात्रा द्यावी. पालाश अन्नद्रव्य सल्फेट ऑफ पोटॅश मधून द्यावे.<br>• तीन वर्षावरील काजूच्या कलमास २० किलो शेणखत, २ किलो युरीया १.५ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ५०० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश ही खते द्यावीत.<br>• वीस वर्षावरील चिकू झाडास ५० किलो शेणखत, ६ किलो युरीया १८ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि ६ किलो म्युरेट ऑफ पोटॅश ही खते द्यावीत.<br>• आंबा, काजू आणि चिकू बागेत पावसाचे अतिरक्त पाण्याचा निचरा होणेसाठी गरजेनुसार चर खोदून घ्यावेत.<br><u>टिप:–</u> पावसाची तिव्रता कमी असताना खते द्यावीत. |
| फळझाडांची लागवड | | • फळझाडांची लागवड करण्यास सुरूवात करावी. आंबा व चिकू या फळझाडाची लागवड १० x १० मिटर अंतरावर करावी. काजू पिकाचीं लागवड ७ x ७ मिटर, कोकम पिकाची लागवड ६ x ६ मिटर, नारळाची लागवड ७.५ x ७.५ मिटर तसेच सुपारीसाठी २.७ x २.७ मिटर अंतरावर करावी.<br><u>टिप:–</u> हापूस आंबा जातीची लागवड करताना १५ ते २० टक्के झाडे केसर, रत्ना, सिंधू किंवा गोवामानकूर या जातींची लावावीत तसेच लावगड केलेल्या फळझाडास काठीने आधार द्यावा. |
| नारळ/ सुपारी | -- | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्ड्यात दर दोन महिन्यांनी कार्बारील पावडरचे (१० लिटर पाण्यात २० ग्रॅम) मिश्रण तयार करून फवारावे.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्यानी पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मिली ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस किंवा २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे.<br>• तीन वर्षावरील प्रत्येक सुपारीच्या झाडास १ घमेल शेणखत किंवा कंपोस्ट खत, १२ किलो हिरवळीचे खत, १६० ग्रॅम युरिया, ५०० ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट, १२५ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश खत द्यावे.<br>• नारळ आणि सुपारी बागेत पावसाचे अतिरक्त पाण्याचा निचरा होणेसाठी चर खोदून घ्यावेत. |
| भाजीपाला आणि फळबाग रोपवाटीका | – | • वेलवर्गीय भाज्यांना काठीचा आधार द्यावा. भाजीपाला क्षेत्रातील तणांचा बंदोबस्त करावा. तसेच प्रती गुंठ क्षेत्रास ७२० ते ८५० ग्रॅम युरिया खताचा एक तृतीयांश हप्ता द्यावा अणि मंडपाची व्यवस्था करावी. .<br>• आंबा कलमे तयार करण्यासाठी आवश्यक आंबा बाठयाची पेरणी करावी.<br>• रोपवाटिकेतील पाण्याचा निचरा होणेसाठी चर खोदून घ्यावेत.<br>• आंबा बाठा कलमे १५ जूलै पूर्वी बांधून पूर्ण करावीत म्हणजे कलमे जगण्याचे प्रमाण चांगले राहिल. |
| दुभती जनावरे/ शेळया | – | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाणी पुरवठयाची व्यवस्था करावी.<br>• गाई, म्हैस आणि शेळया यांना पायलाग प्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |